**आरबीआय/२००७-०८/२१**
**महापरिपत्रक क्र. /०५/२००७-०८**

**जुलै २, २००७**

प्रति,

विदेशी चलनाचे सर्व अधिकृत डिलर्स

**महोदय/महोदया,**

**भारतातून संकीर्ण वित्तप्रेषणावर महापरिपत्रक-**
**निवासी व्यक्तिंसाठी सुविधा**

वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे भारत सरकारच्या अधिसूचना क्र. जीएसआर ३८१(इ) दिनांक मे ३, २००० सह वाचावयाच्या विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ५ अन्वये निवासींसाठी संकीर्ण वित्तप्रेषणाच्या सुविधा अनुज्ञेय आहेत.

२. हे महापरिपत्रक **"भारतातून संकीर्ण वित्तप्रेषणे-निवासी व्यक्तिंसाठी सुविधा"** या विषयावरील सर्व विद्यमान सूचना एकाच ठिकाणी एकत्रित करते. त्याखाली येणाऱ्या परिपत्रकांची, या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या अधिसूचनांची सूची परिशिष्टात दिली आहे.

३. हे महापरिपत्रक एक वर्षाच्या सूर्यास्त कलमासह निर्गमित करण्यात येत आहे. हे परिपत्रक जुलै १, २००८ रोजी मागे घेण्यात येईल आणि त्याच्या जागी विषयावरील अद्यतन महापरिपत्रक येईल.

आपला विश्वासू ,

**(सलीम गंगाधरन)**
**मुख्य महाव्यवस्थापक**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **ए.१ सर्वसाधारण** | ३ |
| ए.२ चलनाची विक्री | ६ |
| **ए.३ वैद्यकीय उपचार** | ७ |
| ए.४ सांस्कृतिक सहली | ८ |
| **ए.५ खाजगी भेटी** | **८** |
| ए.६ व्यावसायिक भेटी | ८ |
| ए.७ विदेशी चलन परत करण्यासाठी कालावधी | ८ |
| **ए.८ खर्च न केलेले विदेशी चलन** | ९ |
| ए.९ सहलीच्या व्यवस्थेसाठी वगैरे साठी वित्तप्रेषण | ११ |
| **ए.१० रुपयात प्रदान** | १३ |
| ए.११ आगाऊ वित्तप्रेषण - सेवांची आयात | १३ |
| ओ.१२ हमीचे निर्गमन-सेवांची आयात | १३ |
| **ए.१३ युएस डॉलर १००,००० ची उदार केलेली योजना** | १४ |
| ए.१४ कागदपत्रे तयार करणे | १६ |
| **ए.१५ पारपत्रावर पृष्ठांकन** | १७ |
| ए.१६ आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डस | १७ |
| **ए.१७ आंतरराष्ट्रीय डेबिटकार्डस** | १८ |
| ए.१८ स्टोअर व्हॅल्यु कार्डस/चार्ज कार्डस/स्मार्ट कार्डस वगैरे | १८ |
| **ए.१९ एम्प्लॉइज स्टॉक ऑप्शन प्लॅन (इएसओपी) खाली विदेशी सुरक्षापत्रांची प्राप्ती** | **१९** |
| ए.२० आयकर निपटारा | १९ |
| परिशिष्ट १ | २० |
| परिशिष्ट २ | २७ |
| परिशिष्ट ३ | ३३ |
| परिशिष्ट ४ | ३५ |
| जोडपत्र | ३८ |

| अधिकृत डिलर द्वारा विदेशी चलनाचे विमोचन | |
|---|---|
| **ए.१ सर्वसाधारण** | १.१ भारतातील रहिवासी व्यक्तिला विविध चालू खाते व्यवहारांसाठी विदेशी चलनाचे विमोचन करण्यासाठी, अधिकृत डिलर्सनी भारत सरकारने विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम १९९९ च्या कलम ५ खाली तयार केलेल्या नियमांचे मार्गदर्शन घ्यावे जे भारत सरकारने अधिसूचना क्र. जी.एस.आर. ३८१ (इ) दिनांक मे ३, २००० (नियम) अन्वये अधिसूचित केलेल्या विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० मध्ये सविस्तर दिलेले आहेत. सदरहू नियमांनुसार, परिशिष्ट १ मध्ये सूचीबद्ध केल्याप्रमाणे काही व्यवहारांच्या प्रवर्गातील विनमय काढण्याला स्पष्टपणे मनाई करण्यात आलेली आहे. नियमाला परिशिष्ट २ मध्ये समाविष्ट केलेल्या व्यवहारांसाठी विनिमय सुविधांना अधिकृत डिलर्स परवानगी देऊ शकतात, जर त्यात विनिर्दिष्टीत केल्याप्रमाणे अर्जदाराने भारत सरकारच्या विभागाकडून/मंत्रालयाकडून मंजूरी प्राप्त केली असेल. परिशिष्ट ३ मध्ये समाविष्ट केलेल्या व्यवहारांच्या बाबतीत, विनिर्दिष्टीत मूल्यापेक्षा अधिक वित्तप्रेषणासाठी रिझर्व्ह बॅंकेची पूर्वनुमति आवश्यक असेल. परिशिष्ट ३ मध्ये विनर्दिष्टीत केलेल्या उंबरठा मूल्यांपर्यंत विदेशी चलनाचे विमोचन अधिकृत डिलर्सकडे सोपवलेले आहे. नियमाला परिशिष्ट २ मध्ये विहीत केलेल्या चलनाच्या विमोचनासाठीचे सर्व अर्ज रिझर्व्ह बॅंकेच्या विदेशी विनिमय विभागाच्या ज्या विभागीय कार्यालयाच्या अधिकारितेअधीन अर्जदार कार्यरत/रहात असेल त्या कार्यालयाकडे संदर्भित करावेत. |
| | १.२ विदेशी चलन ‘‘काढण्या’’त आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डे (आयसीसी),आंतरराष्ट्रीय डेबीट कार्डे(आयडीसी), एटीएम कार्डे, वगैरेंचा समावेश असेल. ‘‘चलना’’त इतर बाबींबरोबरच आयसीसी, आयडीसी आणि एटीएम कार्डांचाही समावेश असेल. त्यानुसार, अधिनियामाखाली बनवलेले, सर्व नियम, नियमने आणि आदेश आयसीसी, आयडीसी आणि एटीम कार्डाच्या उपयोगाला लागू असतील.<br>१.३ विदेशी चलनाची पर्याप्त सुविधा आणि कार्यक्षम ग्राहक सेवा पुरविण्याच्या दृष्टीने भारतीय रिझर्व्ह बॅंकेने व्यापक संकीर्ण बिगर व्यापारी चालू खाते व्यवहार हाती घेण्यासाठी काही एककाना अधिकृत डिलर प्रवर्ग-२ म्हणून प्राधिकृत करून परवाना मंजूर करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार अधिकृत डिलर प्रवर्ग-२ ना खालील बिगर व्यापारी चालू खाते व्यवहारांसाठी विदेशी चलनाचे विमोचन/वित्तप्रेषण करण्याचा अधिकार आहेः<br>(क) खाजगी भेटी<br>(ख) सहल प्रचालक/प्रवासी एजन्ट यांच्याद्वारे समुद्रपार एजन्ट/प्रकर्ते/हॉटेल्स ना वित्तप्रेषण<br>(ग ) व्यावसायिक प्रवास<br>(घ) जागतिक परिषदा आणि विशेष प्रशिक्षणातील सहभागासाठी शुल्क |

| | |
|---|---|
| | (च) आंतरराष्ट्रीय कार्यक्रम/स्पर्धा (प्रशिक्षण, प्रयोजकता आणि बक्षीसाच्या रकमेप्रती) यातील सहभागासाठी वित्तप्रेषण<br>(छ ) चित्रपटाचे चित्रण<br>(ज) विदेशात वैद्यकीय उपचार<br>(झ) कर्मचारीगणाच्या वेतनाची प्रतिपूर्ती<br>(ट) समुद्रपार शिक्षण<br>(ठ) विदेशातील विद्यापीठांबरोबरच्या सामंजस्य करार व्यवस्थेच्या अधीन वित्तप्रेषण<br>(ड) भारतात आणि विदेशात घेतलेल्या परिक्षांसाठी जीआरइ, टीओइएफएल वगैरेंच्या अतिरिक्त गुणपत्रिकेसाठी शुल्क<br>(ढ) रोजगार आणि समुद्रपार नोकरीच्या अर्जांची प्रक्रिया आणि निर्धारण शुल्क<br>(ण) स्थलांतर आणि स्थलांतर समंत्रणा शुल्क<br>(त) इच्छुक स्थलांतरितांसाठी कौशल्य/प्रशस्तिपत्रांच्या निर्धारणाचे शुल्क<br>(थ) प्रवेशपत्र शुल्क<br>(द) पोर्तुगीज/अन्य सरकारांद्वारे असल्यप्रमाणे, कागदपत्रांच्या नोंदणीसाठी आंतरराष्ट्रीय संघटनाना नोंदणी/वर्गणी/सदस्यत्व प्रक्रिया शुल्क. |
| | १.४ नेपाळ आणि भूतान येथील रहिवाशाशी व्यवहार करण्यासाठी आणि त्या देशात प्रवास करण्यासाठी विदेशी चलनाचे विमोचन अनुज्ञेय नाही. (सीएफ. नियमांच्या नियम ३ चे कलम (ब)) |
| **ए.२ चलनाची विक्री** | २.१ रिझर्व्ह बँकेने/भारत सरकारने मंजूरी दिली असल्यास त्या मंजूरीत दिलेल्या वैधतेच्या कालावधीत विदेशी चलन विकता येईल आणि मूळ मंजूरीच्या मागे विक्रीच्या तपशीलाचे पृष्ठांकन करावे. |
| | २.२ एका दिनदर्शिका वर्षात प्राप्त केलेल्या विदेशी चलनाच्या रकमेबाबत प्रवाशाने दिलेल्या घोषणापत्राच्या आधारावर अधिकृत डिलर प्रवासी आणि खाजगी कारणांसाठी विदेशी चलनाचे विमोचन करू शकतो. |
| | २.३ ट्रॅव्हलर्स चेक्सच्या निर्गमाच्या प्रकरणात, प्रवाशाने अधिकृत अधिकाऱ्यांच्या समक्ष चेकवर सही करावी आणि खरेदीदाराची ट्रॅव्हलर्स चेक मिळाल्याची पोचपावती दफ्तरी धारण करावी. |
| | २.४ प्रवाशाला विकण्यात येणाऱ्या एकूण विदेशी चलनापैकी विदेशी चलनी नोटा आणि नाणी यांच्या स्वरूपातील चलन खाली दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत विकावेः<br>(१) इराक, लिबिया, इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, रशियन फेडरेशन आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रकुलातील प्रजासत्ताकांव्यतिरिक्त अन्य देशात जाणारे प्रवासी. युएस डॉलर २००० किंवा त्यांच्या सममूल्यापेक्षा अधिक नाही.<br>(२) इराक किंवा लिबियाला जाणारे प्रवासी. युएस डॉलर ५००० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक नाही. |

| | |
|---|---|
| | (३) इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराण, रशियन फेडरेशन आणि स्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रकुलातील अन्य प्रजासत्ताकांत जाणारे प्रवासी. संपूर्ण चलन विमोचित करता येईल. |
| | २.५ विदेशी चलनाच्या विक्रीशी संबंधित नमुना ए२, संबंधित कागदपत्रांसह, अधिकृत डिलर्सनी त्यांच्या अंतर्गत लेखपरिक्षकांद्वारे पडताळणीसाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी जपून ठेवावा. तथापि, युएस डॉलर ५,००० पेक्षा कमी मूल्याच्या गैरव्यापारी चालू खात्यातील संकीर्ण व्यवहारांसाठी वित्तप्रेषणाच्या अर्जांकरिता असा ए२ नमुना प्राप्त करण्याऐवजी, अधिकृत डिलर्सनी परिशिष्ट -२ मध्ये जोडल्याप्रमाणे सोपा केलेला अर्ज -वजा-घोषणापत्र नमुना प्राप्त करावा. |
| | २.६ जेथे स्व-घोषणापत्राच्या आधारावर वित्तप्रेषणाला परवानगी देण्यात आली आहे अशा प्रकरणात, अर्जात योग्य तपशील पुरविण्याची जबाबदारी ज्याने अशा वित्तप्रेषणाच्या हेतूंचा तपशील प्रमाणित केला आहे त्या अर्जदारावर राहील. |
| **ए.३ वैद्यकीय उपचार** | ३.१ निवासींना विदेशातील वैद्यकीय उपचारांसाठी कोणत्याही अडचणीशिवाय आणि वेळ न घालविता विदेशी चलन प्राप्त करणे शक्य व्हावे या दृष्टीने, अधिकृत डिलर्स, रुग्णालय/डॉक्टर यांच्याकडील कोणत्याही खर्चाचा आग्रह न धरता, अर्जदार भारताबाहेरील वैद्यकीय उपचारांसाठी चलन खरेदी करीत आहे अशा स्व-घोषणापत्राच्या आधारावर, युएस डॉलर १००,००० किंवा त्याच्या सममूल्य रकमेसाठी विदेशी चलनाचे विमोचन करू शकतो. |
| | ३.२ उक्त मर्यादेच्या बाहेरील रकमेसाठी, भारतातील डॉक्टर किंवा विदेशातील रुग्णालय/डॉक्टर यांच्याकडील अंदाजित खर्च अधिकृत डिलरला सादर करणे आवश्यक आहे. |
| | ३.३ विदेशी गेल्यानंतर आजारी पडलेल्या व्यक्तिलासुध्दा भारताबाहेरील वैद्यकीय उपचारांसाठी, अधिकृत डिलरद्वारा विदेशी चलनाचे विमोचन करता येते. |
| **ए.४ सांस्कृतिक सहली** | नर्तक संच, कलावंत वगैरे जे सांस्कृतिक हेतूने विदेश प्रवास करू इच्छितात, त्यांनी त्यांच्या विदेशी चलनाच्या गरजेसाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण आणि संस्कृती विभाग), भारत सरकार यांच्याकडे अर्ज करावा. अधिकृत डिलर्स संबंधित मंत्रालयाच्या मंजूरीच्या बळावर, त्यात दर्शविलेल्या मर्यादा आणि अटींच्या अधीन विदेशी चलनाचे विमोचन करू शकतो. |
| **ए.५ खाजगी भेटी** | कोणत्याही हेतूने भारताबाहेर जाऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिला तो प्राप्त करू इच्छित असलेले विदेशी चलन, अधिकृत डिलर, नियमांना परिशिष्ट ३ मध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या मर्यादेपर्यंत विमोचित करू शकतो. |
| **ए.६ व्यावसायिक भेटी** | व्यावसायिक भेटीसाठी किंवा एकाद्या परिषदेला किंवा विशेष प्रशिक्षणाला हजर राहण्यासाठी किंवा वैद्यकीय उपचारांसाठी किंवा वैद्यकीय तपासणीसाठी विदेशात जाणाऱ्या रुग्णाच्या देखभालीसाठी किंवा वैद्यकीय |

| | |
|---|---|
| | उपचार किंवा तपासणीसाठी विदेशात जाणाऱ्या रुग्णाबरोबर सहाय्यक म्हणून जाण्यासाठी नियमांना परिशिष्ट ३ मध्ये विनिर्दिष्टीत केलेल्या मर्यादेत विदेशी चलन. |
| **ए.७ विदेशी चलन परत करण्याचा कालावधी** | विशिष्ट हेतूसाठी खरेदी केलेले विदेशी चलन त्या हेतूसाठी वापरले न गेल्यास, ते संबंधित नियमनांखाली विदेशी चलन काढण्याची परवानगी असलेल्या अन्य कोणत्याही पात्र हेतूसाठी वापरता येईल. कोणत्याही व्यक्तिला प्राप्त झालेले/वसूल झालेले/खर्च न झालेले/न वापरलेले विदेशी चलन जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे, प्राप्तीच्या/वसूलीच्या/खरेदीच्या/संपादनाच्या/प्रवाशाच्या परत आल्याच्या तारखेपासून १८० दिवसांच्या आत एखाद्या अधिकृत व्यक्तिला परत देण्याची सर्वसाधारण परवानगी आहे.<br>इतर सर्व प्रकरणात, परत करण्याच्या आवश्यकतेवरील नियमने/आदेश अपरिवर्तित राहतील. (सीएफ अधिसूचना क्र. एफइएमए ९/२०००-आरबी दिनांक मे ३, २०००, वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे). |
| **ए.८ खर्च न केलेले विदेशी चलन** | ८.१ वर प्रतिपादन केल्याप्रमाणे , निवासी व्यक्तिने खर्च न केलेले विदेशी चलन परत भारतात आणल्यास ते प्रवाशाच्या परतीच्या तारखेपासून १८० दिवसांच्या आत अधिकृत व्यक्तिकडे परत द्यावे. असा तऱ्हेने परत आणलेले विदेशी चलन त्या व्यक्तिला तिच्या/त्याच्या नंतरच्या विदेशी भेटीसाठी वापरता येईल.<br>८.२ तथापि, परत आलेल्या प्रवाशाला युएस डॉलर २००० च्या एकूण रकमेपर्यंतच्या विदेशी चलनातील ट्रॅव्हलर्स चेक आणि कोणत्याही मर्यादेविना विदेशी नाणी त्याच्याजवळ ठेवण्यास परवानगी आहे (सीएफ. अधिसूचना क्र. एफइएमए ११/२०००-आरबी दिनांक ३ मे, २०००). अशा प्रकारे ठेवून घेतलेले विदेशी चलन, प्रवाशाला त्याच्या नंतरच्या विदेश भेटीसाठी वापरता येईल.<br>८.३ भारताचा निवासी असलेल्या व्यक्तिला, त्याने विदेशात दिलेल्या सेवेसाठी प्रदान, दिलेल्या सेवेसाठी मानधन, भेट म्हणून, दिलेल्या सेवेसाठी किंवा भारताचा निवासी नसलेल्या व्यक्तिच्या कोणत्याही कायदेशीर कर्तव्याची तडजोड म्हणून चलनी नोट, बँक नोट आणि ट्रॅव्हलर्स चेक्सच्या स्वरूपात प्राप्त झालेल्या विदेशी चलनातून भारतातील अधिकृत डिलरकडे, **रेसिडेंट फॉरिन करंसी (डोमेस्टीक) खाते** धारण करता आणि ठेवता येईल.<br>८.४ निवासी व्यक्तिद्वारे असे खाते माल आणि/किंवा सेवेच्या निर्यातीचे उत्पन्न, स्वामित्व, मानधन वगैरेसह विदेशात मिळवलेल्या विदेशी चलनातून आणि/किंवा जवळच्या नातेवाईकांकडून मिळालेल्या भेटींतून (कंपन्या अधिनियमात केलेल्या व्याख्येप्रमाणे) उघडता/क्रेडिट करता येईल आणि सामान्य बँकिंग वहिन्यांमार्फत भारतात प्रत्यावर्तन करता येईल.<br>८.५ चलनी नोटा, बँका नोटा आणि ट्रॅव्हलर्स चेक्सच्या स्वरूपात प्राप्त केलेल्या विदेशी चलनातून रेसिडेंट फॉरिन करंसी (डोमेस्टिक) खात्यात |

| | |
|---|---|
| | जमा करण्यासाठी पात्रता खालीलप्रमाणे आहेः-<br><br>(१) त्याने अधिकृत व्यक्तिंकडून विदेशातील प्रवासासाठी प्राप्त केलेली आणि खर्च न केलेल्या रकमेचा हिस्सा असलेली रक्कम<br>**किंवा**<br>(२) भारतात न केलेल्या कोणत्याही बाबीपासून किंवा कोणत्याही व्यवसायातून न उद्‌भवलेल्या सेवेसाठी प्रदानाच्या मार्गाने, भारताबाहेरील कोणत्याही ठिकाणी भेटीवर असताना आणि मानधन किंवा दानाच्या मार्गाने प्राप्त केलेली रक्कम,<br>**किंवा**<br>(३) त्याने, भारताचा निवासी नसलेल्या आणि भारतात भेटीवर आलेल्या कोणत्याही व्यक्तिंकडून दिलेल्या सेवेसाठी मानधन, भेट म्हणून किंवा कोणत्याही कायदेशीर कर्तव्याची तडजोड म्हणून प्राप्त केलेली रक्कम.<br>**टीपः** *जेव्हा एखादी व्यक्ति विहीत कालावधी उलटल्यानंतर अधिकृत डिलरकडे खर्च न केलेले/न वापरलेले विदेशी चलन परत करण्यासाठी येईल, तेव्हा अधिकृत डिलरने केवळ विहीत कालावधी समाप्त झाल्याच्या कारणाने विदेशी चलन खरेदी करण्याचे नाकारू नये.* |
| **ए.९ सहलीची व्यवस्था वगैरेसाठी वित्तप्रेषणे** | ९.१ प्रवाशाच्या विनंतीवरून तो भेट देणार असलेल्या देशांमधील त्याच्या हॉटेलमधील निवासासाठी, प्रवासाच्या व्यवस्थेसाठी वगैरे अधिकृत डिलर्स रास्त मर्यादेपर्यंत विदेशी चलनाचे वित्तप्रेषण करू शकतात, जर ते प्रवाशाने लागू असलेल्या नियम, नियमने आणि आदेशांनुसार अधिकृत व्यक्तिकडून खरेदी केलेल्या विदेशी चलनांपैकी (विदेशात खाजगी प्रवासासाठी काढलेल्या चलनांसह) असेल.<br>९.२ भारतातील प्रवाशांसाठी हॉटेल निवासाची जागा पुरविणे किंवा प्रवासाच्या अन्य व्यवस्था करणे यासाठी विदेशातील हॉटेल्स/एजन्ट्स बरोबर सामंजस्य करार असलेल्या भारतातील एजन्ट्सच्या विनंतीवरून अधिकृत डिलर्स वित्तप्रेषण करू शकतात, जर अधिकृत डिलरचे समाधान झाले असेल कि, असे वित्तप्रेषण संबंधित प्रवाशाने लागू असलेल्या नियम, नियमने आणि आदेशांनुसार अधिकृत व्यक्तिंकडून खरेदी केलेल्या विदेशी चलनातून (विदेशात खाजगी प्रवासासाठी काढलेल्या चलनासह) केले जात आहे.<br>९.३ अधिकृत डिलर भारतातील प्रवाशांसाठी हॉटेल निवासाची जागा पुरविणे किंवा प्रवासाच्या अन्य व्यवस्था करणे यासाठी विदेशातील हॉटेल्स/एजन्ट्स बरोबर सामंजस्य करार असलेल्या भारतातील एजन्ट्सच्या नावे विदेशी चलन खाते उघडू शकतात, जरः-<br><br>अ) खात्यातील जमा खालील मार्गाने जमा केलेली असेल<br>१) प्रवाशांकडून विदेशी चलनात जमा केलेली रक्कम आणि<br>२) बुकिंग/प्रवास व्यवस्था वगैरे रद्द करण्यापोटी भारताबाहेरून |

| | |
|---|---|
| | प्राप्त झालेला परतावा, आणि<br><br>ब) विदेशी चलनातील डेबिटस भारताबाहेरील हॉटेलमधील निवास, प्रवास व्यवस्था वगैरेसाठी उक्त ९.२ प्रमाणे असेल. |
| **ए.१० रुपयातील प्रदाने** | अधिकृत डिलर्स विदेश प्रवासासाठी (खाजगी भेट किंवा कोणत्याही हेतूने) विदेशी चलनाच्या विक्रीसमक्ष रु. ५०,००० (रुपये पन्नास हजार मात्र) पर्यंतची रक्कम रोख स्वीकारू शकतात. जेथे विदेशी चलनाची विक्री रु. ५०,००० पेक्षा अधिक असेल तेथे प्रदान केवळ खालील प्रकारे प्राप्त करता येईलः<br><br>(१) अर्जदाराच्या बँक खात्यावर काढलेला रेखांकित धनादेश, किंवा<br>(२) अर्जदाराची भेट प्रायोजित करणाऱ्या फर्म/कंपनीच्या बँक खात्यावर काढलेला रेखांकित धनादेश, किंवा<br>(३) बँकर्स धनादेश/प्रदानादेश/दर्शनी धनकर्ष.<br><br>टीपः जेथे काढलेल्या एका प्रवासासाठी काढलेल्या कोणत्याही एका किंवा एकापेक्षा अधिक काढलेल्या रकमा एकत्रित करून येणाऱ्या विदेशी चलनाचे रुपयातील सममूल्य रु. ५०,००० पेक्षा अधिक असेल तर ते धनादेश किंवा धनकर्षाने प्रदान करावे. |
| **ए.११ आगाऊ वित्तप्रेषण - सेवांची आयात** | अधिकृत डिलर्स ज्यांच्यासाठी विदेशी चलनाचे विमोचन अनुज्ञेय आहे अशा चालू खाते व्यवहारांखाली सेवा पुरविण्यासाठी आगाऊ वित्तप्रेषणाला परवानगी देऊ शकतात, तथापि, जेथे रक्कम युएस डॉलर १००,००० किंवा त्याच्या सममूल्यापेक्षा अधिक असेल तर समुद्रपार लाभार्थीकडून भारताबाहेर स्थित असलेल्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय बँकेकडील हमी किंवा भारतातील अधिकृत डिलरकडील हमी, अशी हमी जर भारताबाहेर स्थित प्रतिष्ठीत आंतरराष्ट्रीय बँकेच्या प्रतिहमीसमक्ष निर्गमित करण्यात आली असेल तर, प्राप्त करण्यात यावी. अधिकृत डिलरने आगाऊ वित्तप्रेषणाच्या लाभार्थीने भारतातील वित्तप्रेषका बरोबरच्या कंत्राटाखालील किंवा कराराखालील त्याचे कर्तव्य पूर्ण केले आहे याची खात्री करण्यासाठी पाठपुरावा करावा. |
| **ए.१२ हमी देणे - सेवांची आयात** | अधिकृत डिलर्स सेवा आयात करणाऱ्या त्यांच्या ग्राहकांच्या वतीने हमी देऊ शकतात, जर ः<br>अ. हमीची रक्कम यूएस डॉलर १००,००० पेक्षा अधिक नसेल,<br>ब. एडीचे व्यवहाराच्या प्रमाणिकपणाविषयी समाधान झाले असेल,<br>क. सामान्य पद्धतीने आयात करताना सेवांच्या आयातीसाठी कागदोपत्री पुरावा सादर केला जाईल याची एडीने खात्री केल्यास, आणि<br>ड. निवासी आणि अनिवासी यांच्या दरम्यानच्या कंत्राटातून उद्भवणारे प्रत्यक्ष कंत्राटी दाायित्व सुरक्षित करण्यासाठी हमी असेल.<br>हमी अंमलात आणण्याच्या प्रकरणात. अधिकृत डिलरने मुख्य महाव्यवस्थापक, विदेशी विनिमय विभाग, विदेशी गुंतवणूक कक्ष (इपीडी), भारतीय रिझर्व्ह बँक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई -४०० ००१ याना हमी |

| | |
|---|---|
| | अंमलात आणण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. |
| **ए.१३ युएस डॉलर १,००,००० च्या वित्तप्रेषणाची शिथील केलेली योजना** | १३.१ या योजनेखाली, अधिकृत डिलर्स कोणत्याही अनुज्ञेय चालू किंवा भांडवली खात्यातील किंवा दोन्हीच्या संयुक्त व्यवहारासाठी प्रति दिनदर्शिका वर्षात युएस डॉलर १००,००० पर्यंतच्या वित्तप्रेषणासाठी व्यक्तिला मुक्तपणे परवानगी देऊ शकतात.<br>१३.२ योजनेखालील यूएस डॉलर १००,००० च्या मर्यादेत निवासी व्यक्तिने भेट किंवा दानापोटी केलेल्या वित्तप्रेषणाचाही समावेश असेल.<br>१३.३ योजनेखालील वित्तप्रेषणाना केवळ अनुज्ञेय चालू किंवा भाडंवली खाते व्यवहारांच्या बाबतीत परवानगी आहे. सर्व अन्य व्यवहार ज्याना अन्यथा एफइएमएअधीन परवानगी नाही आणि समुद्रपार विनिमय केंद्रांच्या/समुद्रपार विरुद्ध पक्षाला मार्जिन किंवा मार्जिन कॉल्ससाठी वित्तप्रेषणाच्या स्वरुपातील व्यवहार या योजनेखाली अनुज्ञेय नाहीत.<br>१३.४ निवासी व्यक्ति रिझर्व्ह बॅंकेच्या पूर्वानुमतिविना भारताबाहेर स्थावर मालमत्ता किंवा समभाग किंवा कोणतीही अन्य मत्ता प्राप्त करण्यास किंवा धारण करण्यास मुक्त आहेत.<br>१३.५ व्यक्ति रिझर्व्ह बॅंकेच्या पूर्वानुमतिविना या योजनेखाली वित्तप्रेषण करण्यासाठी भारताबाहेरील बॅंकेत विदेशी चलन खाते उघडू, ठेवू आणि धारण करू शकतात. विदेशी चलन खाती या योजनेशी संबंधित किंवा वित्तप्रेषणातून उद्‌भावणारे सर्व व्यवहार करण्यासाठी वापरता येतील.<br>१३.६ या योजनेखाली वित्तप्रेषण सुलभ व्हावे म्हणून बॅंकानी निवासी व्यक्तिला कोणतीही क्रेडीट सुविधा देऊ नये.<br>१३.७ वित्तप्रेषणाची शिथील केलेली योजना एफएटीएफने असहकारी देश आणि प्रदेश म्हणून निश्चित केलेल्या आणि एफएटीएफ च्या www.fatf-gafi.org या वेबसाइट्‌वर उपलब्ध असलेल्या किंवा रिझर्व्ह बॅंकेने अधिसूचित केल्याप्रमाणे देशाना लागू नाही.<br>१३.८ निवासी व्यक्तिंना युएस डॉलर १००,००० च्या वित्तप्रेषणासाठी शिथील केलेल्या योजनेखाली व्यवहार करण्यासाठी परिशिष्ट-३ मध्ये दिल्याप्रमाणे अर्ज-नि-घोषणापत्राचे प्रपत्र वापरता येईल. |
| **ए.१४ कागदपत्रे तयार करणे** | १४.१ साधारणपणे, रिझर्व्ह बॅंक विदेशी चलनाचे विमोचन करताना अधिकृत डिलर्सनी पडताळणी करायची कागदपत्रे विहीत करणार नाही. या संबंधात, अधिकृत डिलर्सचे लक्ष एफइएमए, १९९९ च्या कलम १० च्या उपकलम (५) कडे वेधण्यात येत आह, ज्यात अशी तरतूद आहे कि, विदेशी चलनात व्यवहार करू इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तिने या व्यवहारात अधिनियमाच्या तरतूदींचा किंवा त्याखाली निर्गमित केलेल्या कोणत्याही नियमांचा, नियमनांचा, अधिसूचनांचा वा आदेशांचा भंग किंवा टाळाटाळ करण्याचा उद्देश नाही किंवा त्यासाठी योजना नाही याबाबत त्याचे समाधान होईल असे घोषणापत्र देणे अधिकृत डिलर्सनी आवश्यक समजावे. |

| | |
|---|---|
| | १४.२ अधिकृत डिलर्सनी ज्या माहितीच्या आधारावर व्यवहार करण्यात आला अशी कोणतीही माहिती/कागदपत्रे रिझर्व्ह  बँकेच्या पडताळणीसाठी आपल्या दफ्तरी ठेवणे आवश्यक आहे. जर अर्जदाराने अशा कोणत्याही आवश्यकतेची पूर्तता करण्यास किंवा त्याची असमाधानकारक पूर्तता केल्यास, अधिकृत डिलरने व्यवहार करण्यास लेखी नकार द्यावा आणि व्यक्तिचा उद्देश कोणत्याही उल्लंघनाचा/टाळाटाळीचा आहे असा त्याला योग्य कारणाने विश्वास वाटत असेल तर त्याने ते प्रकरण रिझर्व्ह  बँकेला कळवावे.<br><br>१४.३ त्यापुढे, अधिकृत डिलर्सना विशेषत्वाने कळविण्यात आले आहे कि विदेशातील नोकरी, स्थलांतर, जवळच्या नातेवाईकाची विदेशात देखभाल, विदेशात शिक्षण आणि विदेशात वैद्यकीय उपचार यासाठी कोणत्याही पुष्टिकारक कागदपत्रांसाठी आग्रह न धरता व्यवहाराचा काही मूलभूत तपशील अंतर्भूत असलेल्या स्व-घोषणापत्राच्या आणि नमुना ए२ सादर केल्याच्या आधारावर त्यांनी प्रत्येकी युएस डॉलर १००,००० पर्यंत विदेशी चलनाचे विमोचन करावे. |
| **ए.१५ पारपत्रावर पृष्ठांकन** | विदेश प्रवासासाठी विकलेल्या विदेशी चलनाच्या रकमेचे प्रवाशाच्या पारपत्रावर पृ्ष्ठांकन करणे अधिकृत डिलर्सना बंधनकारक नाही. परंतु, प्रवाशाने विनंती केल्यास त्यांचा शिक्का, तारीख आणि सहीनिशी ते प्रवासासाठी विकलेल्या विदेशी चलनाची नोंद करू शकतात. |
| **ए.१६ आंतरराष्ट्रीय क्रेडीट कार्डस** | १६.१ विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० च्या नियम ५ मध्ये समाविष्ट असलेले निर्बंध निवासी व्यक्तिने भारताबाहेर भेटीवर असताना च्या खर्चापोटी कार्डाच्या मर्यादेत प्रदान करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डाच्या केलेल्या उपयोगाला लागू नाहीत.<br><br>१६.२ निवासी व्यक्ति भारतातील अधिकृत डिलरकडून चलनाची खरेदी करण्यास परवानगी असलेल्या पुस्तकांच्या आयातीसाठी, डाउनलोडेबल सॉफ्टवेअरच्या खरेदीसाठी किंवा आयात-निर्यात धोरणाखाली अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही अन्य बाबीच्या आयातीसाठी इंटरनेटवर आयसीसीजचा उपयोग करू शकतात.<br><br>१६.३ लॉटरी तिकीटे, बंदी घातलेली किंवा मनाई केलेली मासिके, स्वीपस्टेक्समध्ये सहभाग, कॉल-बॅक सेवांसाठी प्रदान वगैरे मनाई असलेल्या बाबींच्या खरेदीसाठी, अशा बाबींसाठी/कार्यांसाठी विदेशी चलन काढण्यास परवानगी नसल्यामुळे, इंटरनेटवरून किंवा अन्य प्रकारे आयसीसीजचा उपयोग करता येणार नाही.<br><br>१६.४ इंटरनेटमार्फत आयसीसीजचा उपयोग करण्यासाठी कोणतीही एकूण आर्थिक मर्यादा विहीत केलेली नाही. |

| | |
|---|---|
| | १६.५ भारतातील अधिकृत डिलरकडे किंवा विदेशातील बँकेत अस्तित्वातील विदेशी विनिमय नियमनांनुसार अनुज्ञेय असल्याप्रमाणे विदेशी चलन खाते असणाऱ्या निवासी व्यक्ति समुद्रपार बँकांनी किंवा अन्य प्रतिष्ठीत एजन्सीजनी दिलेली आयसीसीज प्राप्त करण्यास मुक्त आहेत. भारतात किंवा विदेशात कार्डाच्या समक्ष लागू होणारे आकार कार्डधारकाच्या अशा विदेशी चलन खात्यात धारण केलेल्या निधीतून किंवा कार्ड धारकाचे भारतातील बँकेत असणऱ्या चालू किंवा बचत खाते आहे, केवळ त्या बँकेमार्फत केलेल्या वित्तप्रेषणातून, काही असल्यास, देता येतील. या हेतूने वित्तप्रेषणसुध्दा थेट कार्ड देणाऱ्या एजन्सीला करावे आणि तिसऱ्या पक्षाला करू नये.<br><br>१६.६ लागू असलेली कार्ड मर्यादा म्हणजे कार्ड देणाऱ्या कंपनीने निश्चित केलेली मर्यादा असेल. या सुविधेखाली, वित्तप्रेषणासाठी, काही असल्यास, आरबीआयने निश्चित केलेली कोणतीही आर्थिक मर्यादा नाही. |
| **ए.१७ आंतरराष्ट्रीय डेबीट कार्डस** | १७.१ विदेशी चलनात व्यवहार करण्यास अधिकार असलेल्या बँका (एडी बँका) आंतरराष्ट्रीय डेबिटकार्डे (आयडीसीज) निर्गमित करतात जी निवासी व्यक्तिला तिच्या विदेश भेटीत रोख रक्कम काढण्यासाठी किंवा समुद्रपार व्यापारी आस्थापनांना प्रदान करण्यासाठी वापरता येतात. हे स्पष्ट करण्यात येत आहे कि, आयडीसीजचा उपयोग केवळ चालू खाते व्यवहारांसाठी अनुज्ञेय आहे आणि या कार्डांचा उपयोग करून केलेला प्रदानाना वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे नियमांना परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे बाब-निहाय मर्यादा तितक्याच लागू आहेत.<br><br>१७.२ लॉटरी तिकीटे, बंदी घातलेली किंवा मनाई केलेली मासिके, स्वीपस्टेक्समध्ये सहभाग, कॉल-बॅक सेवांसाठी प्रदान वगैरे मनाई असलेल्या बाबींच्या खरेदीसाठी, अशा बाबींसाठी/कार्यासाठी विदेशी चलन काढण्यास परवानगी नसल्यामुळे, इंटरनेटवरून आयडीसीजचा उपयोग करता येणार नाही. |
| **ए.१८ स्टोअर व्हॅल्यू कार्डस/चार्ज कार्डस/स्मार्ट कार्डस वगैरे** | काही एडी बँका विदेशात खाजगी/व्यावसायिक भेटीसाठी जाणाऱ्या निवासी व्यक्तिना स्टोअर व्हॅल्यू कार्डे/चार्ज कार्डे/स्मार्ट कार्डे निर्गमित करीत आहेत जी समुद्रपार व्यापारी आस्थापनात प्रदाने करण्यासाठी आणि एटीएममधून रोख रक्कम काढण्यासाठी सुध्दा वापरता येतात. अशी कार्डे निर्गमित करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या पूर्वानुमतीची आवश्यकता नाही. तथापि, अशा कार्डांचा उपयोग अनुज्ञेय चालू खाते व्यवहारांपुरता मर्यादित आहे आणि वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे नियमांखालील विहीत मर्यादांच्या अधीन आहे. |
| **ए.१९ एम्प्लॉइज स्टॉक ऑप्शन प्लॅन(इएसओपी)** | ज्या निवासी व्यक्ति ज्या कंपनीतील विदेशी धारणा ५१ ०/० पेक्षा कमी नाही अशा विदेशी कंपनीच्या भारतीय कार्यालयाचे किवा शाखेचे कर्मचारी |

| | |
|---|---|
| **खाली विदेशी प्रतीभूतींचे संपादन** | किंवा संचालक आहेत त्याना इएसओपी योजनेखाली कोणत्याही अर्थिक मर्यादेविना विदेशी प्रतीभूती प्राप्त करण्याची परवानगी आहे. जर त्यातून आलेले उत्पन्न भारतात प्रत्यावर्तित करण्यात आले, तर त्याना समभाग मुक्तपणे विकण्याचीसुद्धा परवानगी आहे. |
| **ए.२० आयकर निपटारा** | वित्तप्रेषकाने शपथपत्र आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांनी त्यांच्या परिपत्रक क्र. १०/२००२ दिनांक ऑक्टोबर ९, २००२ (सीएफ ए.पी.(डिआयआर मालिका) परिपत्रक क्र. ५६ दिनांक नोव्हेंबर २६, २००२) मध्ये विहीत केलेल्या प्रारूपात (परिशिष्ट- ४) चार्टर्ड अकाउंटंटकडील प्रमाणपत्र हजर केल्यास  अनिवासी व्यक्तिना वित्तप्रेषण करण्यास अधिकृत डिलर्सना परवानगी आहे. |

## विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार ) नियम, २०००

अधिसूचना क्र. जी.एस.आर.(इ) दिनांक ३ मे २००० (वेळोवेळी दुरुस्त केल्याप्रमाणे)*: विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ च्या कलम ५ आणि कलम ४६ च्या उपकलम (१) आणि उप्कलम (२) च्या खंड (अ) अन्वये प्राप्त अधिकारात आणि रिझर्व्ह बँकेशी संमंत्रणा करून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने करणे आवश्यक वाटल्याने केंद्र सरकार येणेप्रमाणे खालील नियम करीत आहे :-

**१. अल्प शीर्षक आणि आरंभ.—**(१) या नियमाना विदेशी विनिमय व्यवस्थापन (चालू खाते व्यवहार) नियम, २००० असे म्हटले जाईल;
(२) ते जून २००० च्या १ ल्या दिवसापासून प्रभावी होतील.

**२. व्याख्या -- या नियमांत, अन्य संदर्भाने आवश्यक असल्याविना;**

(अ) ‘अधिनियम’ म्हणजे विदेशी विनिमय व्यवस्थापन अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४२);
(ब) ‘काढणे’ म्हणजे अधिकृत व्यक्तिकडून विदेशी चलन काढणे आणि त्यात पतपत्र उघडणे किंवा आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डाचा किंवा आंतरराष्ट्रीय डेबिटकार्डाचा किंवा एटीएमचा उपयोग करणे किंवा विदेशी चलनाशी संबंधित दायित्व निर्माण होण्याचा परिणाम असणारी कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या बाबीचा उपयोग करणे समाविष्ट आहे.
(क) ‘परिशिष्ट’ म्हणजे या नियमाना जोडलेले परिशिष्ट
(ड) या नियमात व्याख्या न केलेल्या परंतु अधिनियमात व्याख्या केलेल्या शब्दांचा अणि अभिव्यक्तिंचा अर्थ त्यांना अधिनियमात त्यांच्या संबधात दिलेल्या अर्थाप्रमाणेच असेल.

**३. विदेशी चलन काढण्यावर मनाई** - येणेप्रमाणे खालील हेतूंसाठी कोणत्याही व्यक्तिने विदेशी चलन काढण्यावर मनाई असेलः

अ. परिशिष्ट १ मध्ये विनिर्दिष्टीत केलेला व्यवहार; किंवा
ब. नेपाळ आणि/किंवा भूतानला प्रवास करण्यासाठी; किंवा
क. नेपाळ किंवा भूतान येथे राहणाऱ्या व्यक्तिबरोबर व्यवहार.

परंतु खंड (क) मधील मनाईतून आरबीआय तिला विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे ठरविणे आवश्यक वाटेल अशा अटी आणि शर्तींच्या अधीन सूट देऊ शकते.

**४. भारत सरकारची पूर्वानुमति**

कोणतीही व्यक्ति भारत सरकारच्या पूर्वानुमतिविना परिशिष्ट २ मध्ये समाविष्ट केलेल्या व्यवहारासाठी विदेशी चलन काढणार नाही.

अशी तरतूद करण्यात आली आहे कि, वित्तप्रेषकाच्या निवासी विदेशी चलन (आरएफसी) खात्यात धारण केलेल्या निधीतून प्रदान केल्यास हे नियम लागू असणार नाहीत.

**५. रिझर्व्ह  बँकेची पूर्वानुमति**

कोणतीही व्यक्ति रिझर्व्ह  बँकेच्या पूर्वानुमतिविना परिशिष्ट ३ मध्ये समाविष्ट केलेल्या व्यवहारासाठी विदेशी चलन काढणार नाही.

अशी तरतूद करण्यात आली आहे कि, वित्तप्रेषकाच्या निवासी विदेशी चलन (आऱएफसी) खात्यात धारण केलेल्या निधीतून प्रदान केल्यास हे नियम लागू असणार नाहीत.

**६.** (१) नियम ४ वा नियम ५ मध्ये समाविष्ट असलेले काहीही वित्तप्रेषकाच्या एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी (इइएफसी) खात्यात धारण केलेल्या निधीतून काढलेल्या रकमेला लागू होणार नाही.

(२) उपनियम (१) खाली समाविष्ट असलेले काहीही लक्षात न घेता नियम ४ आणि नियम ५ खाली घालण्यात आलेले निर्बंध जसे प्रकरण असेल त्याप्रमाणे परिशिष्ट २ च्या बाबी १० आणि ११ किंवा परिशिष्ट ३ च्या बाबी ३, ४, ११, १६ आणि १७ मध्ये विनिर्दिष्टित केलेल्या हेतूसाठी एक्स्चेंज अर्नर्स फॉरिन करंसी (इइएफसी) खात्यातून काढलेल्या रकमेला लागू होणे चालूच राहील.

**७. भारताबाहेर असताना आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डचा उपयोग**

नियम ५ मध्ये समाविष्ट असलेले काहीही एखाद्या व्यक्तिने ती व्यक्ति भारताबाहेर भेटीवर असताना येणारा खर्च करण्यासाठी केलेल्या आंतरराष्ट्रीय क्रेडिट कार्डाच्या उपयोगाला लागू होणार नाही.

**परिशिष्ट १**
**ज्या व्यवहारांना मनाई आहे**
**(नियम ३ पहा)**

१. लॉटरीत मिळालेल्या रकमेतून वित्तप्रेषण

२. रेसिंग/रायडिंग किंवा अन्य कोणत्याही छंदातून मिळालेल्या उत्पन्नातून वित्तप्रेषण.

३. लॉटरी तिकीटांच्या, बंदी घातलेल्या/निषिध्द मासिकांच्या, फूटबॉल पूल्स, स्वीपस्टेकस इत्यादिंच्या खरेदीसाठी वित्तप्रेषण.

४. भारतीय कंपन्यांच्या विदेशातील संपूर्ण मालकीच्या/संयुक्त साहसांच्या समभागातील गुंतवणूकीपोटी केलेल्या निर्यातीवार वटावाचे प्रदान.

५. लाभांशाचा समतोल राखणे ज्या कंपन्यांना लागू आहे अशा कोणत्याही कंपनीचे लाभांशप्रेषण.

६. चहा आणि तंबाखू यांच्या निर्यातीच्या इन्व्हॉइस मुल्याच्या १० % ंपर्यंत वटावाव्यतिरिक्त, रुपी स्टेट क्रेडिट रूट अधीन निर्यातीवर वटावाचे प्रदान.

७. दूरध्वनीच्या ‘कॉल बॅक सेवेशी’ संबंधित प्रदान.

८. नॉन-रेसिडेंट स्पेशल रुपी (अकाउंट) योजनेत धारण केलेल्या निधीवरील व्याजाच्या उत्पन्नाचे वित्तप्रेषण.

## परिशिष्ट २
## ज्या व्यवहारांना केंद्र सरकारच्या पूर्वानुमतिची आवश्यकता आहे
## (नियम ४ पहा)

| **वित्तप्रेषणाचा हेतू** | **भारत सरकारचे मंत्रालय/विभाग ज्याची मंजूरी आवश्यक आहे** |
|---|---|
| १. सांस्कृतिक सहली | मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण आणि संस्कृती विभाग) |
| २. राज्य सरकार आणि त्यांचे सार्वजनिक उपक्रम यांच्याद्वारे पर्यटनाचे प्रवर्तन, विदेशी गुंतवणूक आणि आंतरराष्ट्रीय बोली(युएस डॉलर १०००० च्या वर) व्यतिरिक्त विदेशी मुद्रित माध्यमातील जाहिराती | वित्त मंत्रालय (आर्थिक व्यवहार विभाग) |
| ३.पीएसयुने भाड्याने घेतलेल्या जहाजाच्या भाड्यासाठी वित्तप्रेषण | भू वाहतूक मंत्रालय (चार्टरिंग विभाग) |
